# महानिर्मितीचे वार्षिक कामगिरी पुनर्विलोकन बहुवर्षीय वीजदर वर्ष २००७–०८

## कार्यकारी सारांश

# कार्यकारी सारांश

महाराष्ट्र राज्य वीजनिर्मिती कंपनी मर्यादित (महानिर्मिती : विनंती अर्जदार) आर्थिक वर्ष २००७-०८ ते २००९-१० या पहिल्या नियंत्रण कालावधीत पहिल्या वर्षासाठी वार्षिक कामगिरी पुनर्विलोकन विनंती अर्ज सादर करीत आहेत्र आर्थिक वर्ष २००६-०७ मधील प्रत्यक्ष खर्च एप्रिल २००७ ते सप्टेंबर २००७ या कालावधीत केलेला प्रत्यक्ष खर्च आणि आर्थिक वर्ष २००७-०८ मधील उर्वरित कालावधीकरिता अनुमानित खर्च यावर सदर विनंती अर्ज आधारित आहे. अर्जदार, नियंत्रण कालावधीतील आगामी वर्षात कराव्या लागणाऱ्या खर्चाचे सुधारित अंदाजही सादर करीत आहेत. हा विनंती अर्ज, महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग (वीज दराच्या अटी व शर्ती) विनियम २००५ (यापुढे ज्यांचा उल्लेख 'विनियम' किंवा 'म.वि. नियामक आयोगाचे वीज दर विनियम' असा केलेला आहे.) यातील निर्धारित तत्त्वांवर दाखल करण्यात आले आहे.

आयोगाने दिनांक २५ एप्रिल २००७ च्या बहुवर्षीय वीजदर आदेशात अर्जदाराच्या वीजनिर्मिती केंद्रासाठी प्रमाणक कामगिरी प्राचले विहित केलेले आहेत. अर्जदार २००६-०७ या वर्षाच्या लेखापरिक्षित केलेल्या लेख्यांवर आधारित खर्चास या अर्जाद्वारे मंजुरी मागत आहेत. आयोगाने मान्य केलेल्या कामगिरी प्राचालांतुलनेत अर्जदार त्यांच्या वीजनिर्मिती केंद्राची एप्रिल ०७ ते सप्टेंबर ०७ या कालावधीतील प्रत्यक्ष कामगिरी आणि ऑक्टोबर ०७ ते मार्च ०८ या उर्वरित कालावधीचे कामगिरी अनुमान सादर करीत आहेत. कामगिरीच्या मान्य पातळीपासून विचलित होण्याची सर्व कारणे प्रस्तुत विनंती अर्जात सविस्तर मांडली आहेत. एप्रिल ते सप्टेंबर २००७ या कालावधीतील वीजनिर्मिती संचाची प्रत्यक्ष कामगिरी लक्षात घेऊन, आयोगाने संयंत्राच्या कामगिरीची मानके अर्जदाराने येथे केलेल्या विनंतीप्रमाणे व्यवहारतः साध्य करण्यायोग्य पातळीवर विचारात घ्यावीत.

विद्युत अधिनियम २००३, कलम १३१ (५) (जी) याअन्वये दिनांक ६ जुन २००५ रोजी अधिसुचित करण्यात आलेल्या तात्पुरत्या हस्तांतरण योजनेस अद्याप अंतिम रूप देण्यात आलेले नाही या वस्तुस्थितीकडे आयोगाचे लक्ष वेधण्यात येत आहे. सदर योजनेस अंतिम रूप देणे प्रलंबित असल्याच्या कारणास्तव मालमत्तेच्या बाबतीत, विद्युत अधिनियम २००३ चे कलम १३१(२) च्या पहिल्या परंतुकानुसार संभाव्य महसुलावर आधारित असलेल्या तिच्या हस्तांतरित मुल्यात बदल होऊ शकतो. अशा प्रसंगी महानिर्मितीचा फायदा व महसुल यांवर आघात करू शकणाऱ्या कोणत्याही आदेशाचे पुनर्विलोकन करावे म्हणुन अर्जदारास आयोगाकडे धाव घ्यावी लागेल.

अर्जदार, आर्थिक वर्ष २००६-०७ मधील प्रत्यक्ष खर्च, आयोगाने मान्य केलेल्या मुल्यांच्या तुलनेत वर्ष २००७-०८ मधील सुधारीत खर्च यांचा सारांश आणि वर्ष २००८-०९ करिता खर्चाचे सुधारीत अनुमान पुढीलप्रमाणे सादर करीत आहेत.

महानिर्मिती यांची एकत्रित वार्षिक महसुलाची आवश्यकता (रक्कम, कोटी रूपयांत) औष्णिक विद्युत केंद्राकरिता

| अ.क. | तपशील | २००६–०७ प्रत्यक्ष | २००७–०८ | | २००८–०९ सुधारीत अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | | | अंदाजित | मान्य केलेला खर्च | |
| १ | इंधनसंबंधीत खर्च/ भाडेपट्टी आकार | ५५६५.२२ | ६०६७.२८ | ५६२४.०० | ६४०१.३६ |
| २ | संचालन व सुव्यवस्था विषयक खर्च | ८०५.९६ | ८९९.३६ | ८१६.२९ | ९४७.७५ |
| ३ | घसारा, त्यासाठीच्या अग्रिमासहीत | ४५१.४७ | ३९७.३५ | ३३१.९९ | ३७१.८४ |
| ३(क) | घसारा, (मुख्य कार्यालय) | ०.३१ | ०.३१ | ०.०० | ०.३१ |
| ४ | दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | ८१.५६ | १०६.७४ | ११५.४९ | ११८.१९ |
| ५ | खेळत्या भांडवलावरील व्याज | २०२.८० | २५७.०१ | २०९.३९ | २५९.१८ |
| ६ | इतर खर्च (लेख्यांनुसार) | ३१.७८ | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ६(क) | पुर्वकालीन मंजूर समायोजने | ८.९५[१] | ०.०० | –८.९५ | ०.०० |
| ७ | आयकर | १२०.५२ | ४०.६६ | ४०.२६ | ४०.६६ |
| **८** | **एकूण महसुली खर्च** | **७२६८.५७** | **७७६८.७१** | **७१२८.४७** | **८१३९.२९** |
| ९ | भाग भांडवलावरील परतावा | ३५८.८८ | ३५८.८८ | ३५८.८८ | ३५८.८८ |
| **१०** | **एकूण महसुलाची गरज** | **७६२७.४५** | **८१२७.५९** | **७४८७.३५** | **८४९८.१७** |
| ११ | परळी, संच–1 करीता एकूण वार्षिक महसुलाची आवष्यकता | ०.०० | १४५.६१ | ३६६.४९ | ३४९.६४ |
| १२ | परस, संच–1 करीता एकूण वार्षिक महसुलाची आवश्यकता | ०.०० | ४०.५८ | ३०३.१८ | ३२४.४८ |
| **१३** | **एकूण वार्षिक महसुलाची आवश्यकता** | **७६२७.४५** | **८३१३.७८** | **८१५७.०२** | **९१७२.२९** |
| १४ | वीज दराव्यतिरिक्त उत्पन्न | ९५.०९ | ४१.७६ | ११२.९३ | ४१.४७ |

**टीप :** वर्ष २००५–०६ मधील सर्वसमावेशक मांडणी (ज्तनम दृ नचद्ब संगणना विचारात न घेता. अर्जदार २००६–०७ च्या एकुण महसुलाच्या आवश्यकतो केवळ रू. ८.९५ कोटीची वाढ मागत आहेत. आयोगाने वर्ष २००५–०६ च्या मांडणीची परीगणना करून महसूल अधिक असल्याचे समजून २००५–०६ च्या मांडणीची परिगणना करून महसुलाच्या आवश्यकतेतून जी रक्कम कमी केली होती तीच ही रक्कम आहे.

महानिर्मिती यांची एकत्रित वार्षिक महसुलाची आवश्यकता (रक्कम, कोटी रूपयांत) जल विद्युत केंद्राकरिता

| अ. क. | तपशील | २००६–०७ प्रत्यक्ष | २००७–०८ | | २००८–०९ सुधारीत अंदाज |
|---|---|---|---|---|---|
| | | | अंदाजित | मान्य केलेला खर्च | |
| १ | इंधनसंबंधीत खर्च/ भाडेपट्ट्टी आकार | ८५.००* | ८५.००* | ८५.०० | ८५.००* |
| २ | संचालन व सुव्यवस्था विषयक खर्च | ४८.४९ | ७०.३५ | ४५.३१ | ७४.१४ |
| ३ | घसारा, त्यासाठीच्या अग्रिमासहीत | ६.६१ | १३.०६ | ४.२१ | ११.२५ |
| ४ | दीर्घकालीन कर्जाऊ भांडवलावरील व्याज | २.१९ | ७.०० | ८.८३ | ७.५४ |
| ५ | खेळत्या भांडवलावरील व्याज | ३.१२ | ४.६८ | ३.४२ | ४.८२ |
| ६ | इतर खच (लेख्यांनुसार) | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ७ | टायकर | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| **८** | **एकूण महसुली खर्च** | **१४५.४१** | **१८०.०९** | **१४६.७७** | **१८२.७५** |
| ९ | भाग भांडवलावरील परतावा | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| **१०** | **एकूण महसुलाची गरज** | **१४५.४१** | **१८०.०९** | **१४६.७७** | **१८२.७५** |
| ११ | वेज दराव्यतिरिक्त उत्पन्न | ०.५९ | ०.६१ | ०.३३ | ०.६३ |

* महाराष्ट्र शासनाने प्रसिध्द केलेल्या राजपत्रातील ठरावात केल्याप्रमाणे पट्टाभाडयाचे पुनरीक्षण केले जावे याकरिता अर्जदारांनी स्वतंत्र विनंती अर्ज केला आहे. सदर ठरावात पट्टा भाडे २००६–०७ (रु. ४४५.५३ कोटी), २००७–०८ (रु. ४६७.८० कोटी), आणि २००८–०९(रु. ४९१.८५ कोटी) असे पुनरीक्षित करण्यात आलेले आहे.

## स्थिर खर्च

स्थिर आकार म्हणजे, वीजनिर्मिती केंद्राची प्रत्यक्षातील वीजनिर्मिती लक्षात न घेता, त्याच्या प्रमाणकानुसार उपलब्धतेच्या आधारे वीजनिर्मिती कंपनीस द्यावयाचे करारबद्ध क्षमता आकार याविषयी अर्जदारांचे सादर निवेदन आहे की, त्यांनी आपल्या बहुवर्षीय वीजदर याचीकेमध्ये सादर केलेली उपलब्धता अनुमाने सन्माननीय आयोगाने विचारात घेतलेली होती. सदर उपलब्धता अनुमाने, केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या पद्धतीवर अधिष्ठित आणि भार क्षमतेची संकल्पना अंतर्भुत असलेली आहेत, असे ठळकपणे नमुद करीत आहेत. सर्व वीजनिर्मिती केंद्राबाबतीत याप्रमाणे उपलब्धता उच्चतर पातळीवर अनुमानित केली होती. तथापि, प्रस्तुत वार्षिक कामगिरी पुनर्विलोकनात आयोगाच्या पद्धतीस अनुसरून उपलब्धता सादर करीत आहे. या पध्दतीनुसार बहुतेक विद्युत केंद्राची उपलब्धता आयोगास मान्य असलेल्या प्रमाणित पातळीहून कमीच असतील.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या वीजदर विनियमांनुसारचे उपलब्धता प्रमाणक नवीन वीज निर्मिती केंद्रांना लागू असावे आणि तेच निकष अर्जदाराच्या मालकीच्या सध्या अस्तित्वात असलेल्या (जुन्या) वीज निर्मिती केंद्रांना लावु नयेत, अशी अर्जदारांची आयोगास

विनंती आहे. विजनिर्मिती केंद्रातील बिघाडांस प्रतिबंध करण्यात व केंद्राची भार–क्षमता वाढवण्यात गंभीर अडथळे आहेत.

अर्जदार ठळकपणे नमुद करीत आहेत की, कमी पातळीवरील उपलब्धतेची कारणे त्यांच्या नियंत्रणपलिकडील आहेत आणि त्याबाबत पुनःस्थापनयोग्य झालेल्या जुन्या संचाच्या घसरत्या कामगिरीकडे प्रामुख्याने निर्देश करावा लागेल. असे संच चालू स्थितीत ठेवण्याकरीता अर्जदार केवळ त्यांच्या नुतनीकरण व आधुनिकीकरणचा किमान खर्च पत्करीत आहेत. महाराष्ट्र राज्यातील विजेची तीव्र टंचाई पाहता, ही जुनी वीज निर्मिती केंद्रे, वयोमानपरत्वे त्यांची कामगिरी घसरली असुन देखील कार्यरत ठेवणे अद्यापही राज्यातील उपभोक्त्यांच्या हिताचे आहे. यामुळे महावितरण कंपनीने जास्त दराने करावयाच्या अल्प मुदतीच्या वीज खरेदीवरील खर्चात केवळ बचतच होईल असे नव्हे तर जुन्या संचांचे पुनःस्थापन केले जाईपर्यंतच्या काळात भार नियमनाच्या सध्याच्या उच्च पातळीतही घट होईल.

यास्तव अर्जदारांची आयोगास विनंती आहे की, कमी पातळीवरील उपलब्धतेविषयीचे प्रामाणिक निवेदन विचारात घ्यावे आणि अर्जदारास त्याच्या स्थिर आकाराची संपुर्णपणे वसूली करण्याची मुभा द्यावी.

**अस्थिर आकार :**

प्रति युनिट वर्ष २००७–०८ मधील खर्च आणि वर्ष २००८–०९ करिताची सुधारित अनुमाने यांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

**अस्थिर खर्चाची अनुमाने (रू. प्रति कि. वॅा. तास)**

| ठिकाण | २००७–०८ | | २००८–०९ | |
|---|---|---|---|---|
| | मान्य केलेला खर्च | सुधारीत अंदाज | मान्य केलेला खर्च | सुधारीत अंदाज |
| भुसावळ | १.६४ | १.९३ | / | २.०३ |
| चंद्रपूर | १.१७ | १.२७ | / | १.३४ |
| नाशिक | १.६३ | १.९३ | / | २.१४ |
| कोराडी | १.०८ | १.३५ | / | १.३८ |
| पारस | १.४९ | १.७२ | / | १.७७ |
| परळी | १.६४ | १.८८ | / | १.९८ |
| उरण | ०.८३ | ०.७६ | / | ०.७६ |
| खापरखेडा | १.०४ | १.२७ | / | १.३६ |

*/ : आयोगाने बहुवर्शीय वीजदर आदेशात उपबंधीत केलेला नाही.*

निरनिराळया वीजनिर्मिती केंद्रांचा प्रति युनिट वीजनिर्मितीचा एकूण खर्च पुढे नमूद केल्याप्रमाणे आहे.

**महानिर्मिती यांच्या एकूण खर्चाची अनुमाने. ( रू. प्रति कि. वॉ. तास)**

| ठिकाण | २००७-०८ | | २००८-०९ | |
|---|---|---|---|---|
| | मान्य केलेला खर्च | सुधारीत अंदाज | मान्य केलेला खर्च | सुधारीत अंदाज |
| भुसावळ | १.९७ | २.३९ | * | २.५३ |
| चंद्रपूर | १.५४ | १.६६ | * | १.७५ |
| नाशिक | १.९४ | २.३६ | * | २.६३ |
| कोराडी | १.३९ | १.८२ | * | १.८६ |
| पारस | १.७९ | २.५४ | * | २.५७ |
| परळी | १.९७ | २.४० | * | २.४८ |
| उरण | १.३४ | १.२२ | * | १.२० |
| खापरखेडा | १.६७ | २.०३ | * | २.०७ |
| जलविद्युत केंद्र | ०.३७ | ०.२९ | * | ०.२९ |

* *आयोगाने बहुवर्शीय वीजदर आदेशात उपबंधीत केलेला नाही.*

परळी येथील नवीन संच ( क्रियान्वयन दिनांक १ नोव्हेंबर २००७) आणि पारस येथील नवीन संच (डिसेंबर २००७ अखेर क्रियान्वयन अपेक्षित) याबाबतीत अर्जदारांचे निवेदन आहे की, अशा संचांशी संबंधीत लेखापरीक्षित लेख्यांना अंतिम रूप दिल्यानंतर अर्जदार वीजदर मान्यतेसाठी (ज्याची बरोबर मांडणी पुढील वार्षिक कामगिरी पुनर्विलोकनात करण्यात येईल). त्या वेळेपर्यंत, आयोगाने महानिर्मिती यांच्या करिता वर्ष २००६-०७ च्या वीजदर आदेशात मान्यता दिलेल्या तात्पुरत्या दराने अर्जदार आकारणी करतील.

## प्रार्थना

अर्जदार आदरपूर्वक प्रार्थना करतात की,

क) सन्माननीय आयोगाने हा विनंतीअर्ज स्वीकृत करावा.

ख) वर्ष २००६-०७ करिता, त्या वर्षीच्या लेखापरीक्षित लेख्यांच्या आधारे खर्चाची मांडणी करण्यास आयोगाने मुभा द्यावी.

ग) महानिर्मिती यांनी प्रस्तुत विनंती अर्जात केलेली सदर निवेदने आणि कारणमीमांसा यांना अनुसरून आयोगाने वर्ष २००७-०८ ची सुधारीत अनुमाने विचारात घ्यावीत आणि महानिर्मिती यांची २००८-०९ या वर्षासाठी एकूण महसुलाची आवश्यकता मान्य करावी.

घ) विनंती अर्जातील त्रुटी क्षमापित कराव्यात आणि नंतरच्या टप्प्यात आवश्यकतेप्रमाणे अतिरिक्त माहिती/आधारसामग्री सादर करण्यास महानिर्मिती यांना परवानगी असावी.

च) विनंती अर्ज सादर करण्यास झालेला विलंब क्षमापित करावा.